# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे — ४११०१६
(०२०)२५६५६२३४, फॅक्स : (०२०)२५६५६२३४
email : ropune@dtemaharashtra.gov.in website : www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/लेखा-१/२०१९/ ८४१२ दिनांक 24 DEC 2019

**तात्काळ**

प्रति,
संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड/अवसरी.
प्राचार्य, शासकीय औषधनिर्माण महाविद्यालय / तंत्रनिकेतन, कराड
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन पुणे / सोलापूर / कोल्हापूर/मिरज/कराड/अवसरी/तासगांव
प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे
प्राचार्य, म.रा.हॉटेल मॅनेजमेन्ट अँड केटरींग टेक्नॉलॉजी, पुणे

विषय :- महसूल जमा/भरणा करण्यासाठी Government Receipt Accounting System (GRAS) प्रणाली लागू करणेकामी विहीत नमुन्यात घोषणापत्र सादर करणेबाबत.

संदर्भ :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र.१५/तंशिसं/अर्थसं/महसूल जमा/२०१९/१०१ दि. २४-१२-२०१९

उपरोक्त संदर्भाकित पत्राचे अवलोकन करावे. शासनाच्या महसूली जमेची अद्ययावत व तंतोतंत आकडेवारी दैनंदिन स्वरुपात उपलब्ध होऊन शासनाच्या निधीच्या विनियोगाचे नियोजन योग्य प्रकारे करणे शक्य व्हावे या दृष्टीने दिनांक ०१ एप्रिल २०२० पासून शासकीय महसूली जमा / भरणा फक्त GRAS प्रणालीद्वारे स्विकारण्यात येणार आहे. तरी पुणे विभागांतर्गत सर्व संस्था ग्रास प्रणालीवर समाविष्ट करण्यासाठी आपल्या संस्थेचे सोबत जोडलेले विहित नमुन्यातील घोषणापत्र भरुन संचालनालयाच्या desk15@dtemaharashtra.gov.in या मेल आयडीवर तसेच या कार्यालयास २ प्रतीत दिनांक २७-१२-२०१९ पर्यंत सादर करण्यात यावे. सदरची माहिती वरिष्ठ कार्यालयास सादर करावयाची असल्याने प्राधान्यक्रमाने पाठविण्यात यावी.

सहपत्र :- संदर्भिय पत्र व घोषणापत्र

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः-प्रोग्रॅमर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

D:\all folder\Certificate\cirS.docx

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
E- Mail-desk१५@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्र. : १५/तंशिसं/अर्थसं/महसूल जमा/ २०१९/ १०७
दिनांक :- 24 DEC 2019

विषय :- महसूली जमा/भरणा करण्यासाठी Government Receipt Accounting System (GRAS) प्रणाली लागु करणे कामी विहीत नमुन्यात घोषणापत्र सादर करणेबाबत.

संदर्भ :- उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.८९/साशि-१, दि.२५/११/२०१९.

शासनाच्या महसुली जमेची अद्ययावत व तंतोतंत आकडेवारी दैनंदिन स्वरुपात उपलब्ध होऊन शासनाच्या निधीच्या विनियोगाचे नियोजन योग्य प्रकारे करणे शक्य व्हावे या दृष्टीने महसुली जमेच्या रक्कमा ग्रास प्रणालीमार्फत स्विकारण्याची सुविधा तातडीने विकसीत करुन घेण्यात यावी अशा प्रकारच्या सुचना शासनाने केलेल्या आहेत.

या संचालनालयाच्या अंतर्गत सर्व कार्यालये/संस्थाकडील जमा होणारा महसूल यापूढे शासनाच्या ग्रास प्रणालीद्वारे ऑनलाईन भरणा करण्यात येणार आहे. **दि. ०१ एप्रिल, २०२० पासुन शासकीय महसूली जमा/भरणा फक्त GRAS प्रणालीद्वारे स्विकारण्यात येणार आहे.** तरी या संचालनालयाच्या अंतर्गत सर्व कार्यालये/संस्था ग्रास प्रणालीवर समाविष्ट करण्यासाठी विहीत नमुन्यामध्ये घोषणापत्र भरुन ते आभाषी कोषागार कार्यालयास सादर करावयाची आहेत.

**सोबत जोडलेले विहीत नमुन्यामधील घोषणापत्र सर्व कार्यालये/संस्थानी दिनांक ३१/१२/२०१९ पर्यंत या संचालनालयास सादर करण्यात यावे. तसेच या कार्यालयाच्या शिघ्र संदर्भाकरीता घोषणापत्र** desk15@dtemaharashtra.gov.in **या Mail ID वर तात्काळ पाठवावे.**

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई

प्रत :-

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांना सुचित करण्यात येते की, विहीत नमुन्यातील घोषणापत्र सादर करणेबाबत आपल्या विभागातील संस्थाना आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात.
२. सर्व संचालक/प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माशास्त्र महाविद्यालये, तंत्रनिकेतने व तत्सम संस्था यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई व उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालये, पुणे, औरंगाबाद व नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

-: < कार्यालयाचे नाव > :-

: घोषणापत्र :

[शासकीय जमा लेखांकन पध्दती (GRAS)]

याव्दारे घोषित करण्यात येते की,

ग्रास(GRAS) प्रणालीद्वारे ---<**विभागाचे / कार्यालयाचे नाव**>--- च्या जमा होणाऱ्या महसूल रकमांचा ताळमेळ हा विहीत पध्दतीनुसार नियतकालिक मुदतीत घेतला जाईल. प्राप्त होणाऱ्या रकमांची चलने त्यांची सेवा पुरविण्यात आल्यानंतर ती विरुपीत (defaced) करण्यात येतील. यासंबंधी जबाबदारी ---<**जबाबदार अधिकाऱ्याचे पदनाम व नाव** >---- यांचेवर सोपविण्यात येत आहे.

ग्रास (GRAS) प्रणालीच्या लॉगईनसाठी पुरविण्यात आलेला पासवर्ड याची गोपनियता पाळून त्याबाबतची जबाबदारी -----<**जबाबदार अधिकाऱ्याचे पदनाम व नाव** >--- यांचेवर सोपविण्यात येत आहे.

---<**विभागाचे / कार्यालयाचे नाव**>--- चा महसूल ग्रास (GRAS) प्रणालीद्वारे इलेक्ट्रॉनिक पध्दतीने स्विकारणे, त्या मध्ये येणाऱ्या अडचणी सोडविणे यासाठी ---<**विभागाचे / कार्यालयाचे नाव**>-- मार्फत ----<**पदनाम**>----- या पदावर कार्यरत असणाऱ्या ----<**जबाबदार अधिकाऱ्याचे नाव**>---- अधिकाऱ्याची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

**संपर्कासाठी समन्वय अधिकाऱ्यांचा ई-मेल आणि कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक तथा भ्रमणध्वनी क्रमांक.**

SAMPLE

सही/-
(अधिकाऱ्याचे नाव)
पदनाम
कार्यालय
**कार्यालयाचा शिक्का**
**कार्यालयाचा/अधिकाऱ्याचा ई-मेल व दुरध्वनी क्र.**

C:\Users\admin\Desktop\GRAS\GRAS Declaration Format Unicode (१).doc

महाराष्ट्र शासन

Email : geeta.chavan@nic.in

क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र. ८९/साशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ३२
दिनांक :- २५ नोव्हेंबर, २०१९

३४
३।१२।१९

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

पत्र प्राप्त झाले
26 NOV 2019
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

विषय :- महाराष्ट्र शासनाच्या एकत्रित निधीत जमा होणारा महसूल प्रणालीवर विहीत मुदतीत नोंदविणेबाबत.

संदर्भ :- वित्त विभाग पत्र क्रमांक सासंअ-२०१९/प्र.क्र. ०९/साधनसंपत्ती, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९

महोदया / महोदय,

वित्त विभागाचे संदर्भाधीन दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९ रोजीचे पत्र सोबत जोडून पाठवित आहे.

२. सदर पत्रासोबत वित्त विभागाने दिनांक १९ जुलै, २०१९ रोजीचे पत्र जोडून पाठविलेले आहे. सदर पत्रातील Government Receipt Accounting System (GRAS) करिता आवश्यक असलेली कागदपत्रे कृपया विहित विवरणपत्रात उपलब्ध करुन देण्याबाबत आपणांस विनंती करण्यात येत आहे.

आपली,

(गी. नि. चव्हाण)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

सोबत : वरील प्रमाणे

प्रत :-

१) कक्ष अधिकारी, कौशल्य विकास व उद्योजगता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना वित्त विभागाचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०१९ चे पत्रासोबत "Annexure A" मधील अनुक्रमांक २५ व २८ संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यासाठी सोबत जोडून पाठवत आहे.
२) अवर सचिव (साधनसंपत्ती) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, "Annexure A" मधील अनुक्रमांक २५ व २८ कौशल्य विकास व उद्योजगता विभागाशी संबंधित आहे.

F:\B Gabhale 2019\Letter 2019.Docx



आवक क्रमांक ... ९९६८
दिनांक २०/११/१९

का. क्र. १५
२७/११

क्रमांक : सासंअं-२०१९/प्र.क्र.०९/साधनसंपत्ती
वित्त विभाग, पाचवा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २१/११/२०१९.
vidya.waghmare@nic.in
कार्यालयीन दूरध्वनी क्र. २२८२८९९२

210
12/11/19

प्रति,

१) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
४) अपर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
५) अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) विशेष आयुक्त, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली,
१०) अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२) अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३) प्रधान सचिव (परिवहन व बंदरे), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५) प्रधान सचिव (सहकार), सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०) प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
२१) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
२२) प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र विभाग, मंत्रालय, मुंबई,
२३) प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२४) प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मंत्रालय, मुंबई,
२५) सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६) सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७) सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
२८) सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई,
२९) सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
३०) सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
३१) सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
३२) संचालक, अल्पबचत व राज्य लॉटरी संचालनालय, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

**विषय :- महाराष्ट्र शासनाच्या एकत्रित निधीत जमा होणारा महसूल GRAS प्रणालीवर विहीत मुदतीत नोंदविणेबाबत.**

**विषय :- या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक १९/०७/२०१९ चे अर्धशासकीय पत्र.**

महोदय/महोदया,

शासनाच्या महसुली जमेची अद्ययावत व तंतोतंत आकडेवारी दैनंदिन स्वरुपात उपलब्ध होऊन शासनाच्या निधीच्या विनियोगाचे नियोजन योग्य प्रकारे करणे शक्य व्हावे या दृष्टीने विविध विभागांमार्फत महसुली जमेशी

ज्या रकमांचा भरणा ग्रास प्रणालीमार्फत करण्यात येत नाही, त्या रकमा ग्रास प्रणालीमार्फत स्विकारण्याची सुविधा तातडीने विकसित करुन घेण्याची कार्यवाही आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील संबंधित विभागीय/क्षेत्रीय कार्यालयांकडून तीन महिन्यात पूर्ण करुन घेण्याबाबतच्या सूचना संदर्भाधीन दिनांक १९/०७/२०१९ च्या अर्धशासकीय पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

तथापि, अद्यापही ब-याच विभागांतर्गत विभागीय/क्षेत्रीय कार्यालयांचा ग्रास प्रणालीमध्ये समावेश झालेला नाही. तसेच ब-याच विभागांकडील सर्व योजना सांकेतांक ग्रास प्रणालीवर समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आले आहे. आपल्या विभागांतर्गत ज्या विभागीय/क्षेत्रीय कार्यालयांचा ग्रास प्रणालीमध्ये समावेश झालेला नाही त्यांची विभागनिहाय यादी सोबतच्या **जोडपत्र-अ** मध्ये सादर केली आहे. सदर विभागांतर्गत/ क्षेत्रीय कार्यालयांना ग्रास प्रणालीमध्ये समाविष्ट करुन घेण्यासाठी संदर्भाधीन अर्धशासकीय पत्रासोबतच्या **जोडपत्र-क** मधील विहीत नमुन्यांमध्ये (सुलभ संदर्भासाठी पत्र सोबत पाठविले आहे.) माहिती भरुन ती माहिती आभासी कोषागार कार्यालयास (virtual treasury) vtodat.mum-mh@gov.in या ई-मेल वर दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यंत सादर करण्याबाबत व आभासी कोषागार कार्यालयाने ठरवून दिलेल्या दिनांकास त्यांच्याशी संपर्क साधण्याबाबत संबंधित विभाग प्रमुखांना सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपली विश्वासू

(विद्या वाघमारे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत : १) जोडपत्र अ
२) दि. १९/०७/२०१९ चे अ.शा. पत्र व सहपत्र.

क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.०९/साधनसंपत्ती

वित्त विभाग
महाराष्ट्र शासन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www. Maharashtra.gov.in*

दिनांक
१९/०७/२०१९

राजगोपाल देवरा
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा)

**विषय :- महाराष्ट्र शासनाच्या एकत्रित निधीत जमा होणारा महसूल GRAS प्रणालीवर नोंदविणेबाबत.**

राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत करण्यात येणा-या योजनांतर्गत (Scheme) खर्च व बांधिल (committed) खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत करण्यात येते. त्यानुसार शासनाच्या योजनांतर्गत (Scheme) व बंधिल (Committed) खर्चासाठी विभागांना निधी उपलब्ध करुन देताना शासनाच्या एकत्रित निधीत जमा होणा-या सर्व महसुलाची अद्ययावत व तंतोतंत आकडेवारी दैनिक स्वरुपात उपलब्ध होणे गरजेचे आहे. राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा होणा-या महसुलाची माहिती महालेखापाल कार्यालयाकडून पुढील महिन्याच्या २५ तारखेला प्राप्त होते. मात्र राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत जमा होणारा सर्व महसूल व जमा होणा-या सर्व रकमांची शासनाने विकसित केलेल्या ग्रास (GRAS) प्रणालीवर नोंद केल्यास शासनास तत्क्षणी अदययावत माहिती मिळू शकते त्यामुळे निधी वितरणाचे योग्य नियोजन करणे सुकर होईल.

याकरीता सर्वप्रथम जे विभाग ग्रास प्रणालीवर आहेत त्यांनी त्यांच्या जमा लेखाशीर्षाखालील सर्व योजना संकेताकाखालील महसुली जमेच्या रकमा ग्रास प्रणालीव्दारे भरणा करणे आवश्यक आहे. तथापि असे निदर्शनास आले की, बऱ्याच विभागांकडील सर्व योजना संकेतांक ग्रास प्रणालीवर समाविष्ट नाहीत. तसेच सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद लेखाशिर्षे ग्रास प्रणालीमध्ये समाविष्ट केलेली असताना काही विभाग वगळता इतर सर्व विभागांकडील रकमा अल्प प्रमाणात ग्रास प्रणालीद्वारे भरणा होत आहेत. जे विभाग पूर्वीपासून ग्रास प्रणालीवर आहेत व अजूनही प्रणालीमार्फत ई-चलनाने रक्कम जमा न करता हस्तलिखित चलनाद्वारे कोषागारात रक्कम जमा करत आहेत, अशा विभागांनी ग्रास प्रणालीद्वारे ई-चलनाने रक्कम भरणे अनिवार्य आहे. तसेच आपल्या विभागाशी संबंधित लेखाशीर्षाखालील महसुलाच्या सर्व योजना सांकेतांक ग्रास प्रणालीवर समाविष्ट करून घेण्याबाबत संबंधित विभाग प्रमुखांना सूचना देण्यात याव्यात.

सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद विभागांचा ग्रास प्रणालीमध्ये समावेश झालेला नाही. सदर विभाग व त्याअंतर्गत विभागांना ग्रास प्रणालीमध्ये समाविष्ट करून घेण्याकरीता सोबत जोडलेल्या परिशिष्ट- क मधील विहित नमुन्यांमध्ये माहिती भरून ती माहिती आभासी कोषागार कार्यालयास (virtual treasury) vtodat.mum-mh@gov.in या ई-मेल वर दि. ३१ जुलै, २०१९ पर्यंत सादर करण्याबाबत व आभासी कोषागार कार्यालयाने ठरवून दिलेल्या दिनांकास त्यांच्याशी संपर्क साधण्याबाबत संबंधित विभाग प्रमुखांना सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

आपला स्नेहांकित,

(राजगोपाल देवरा)